महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था

स.नं.३४ क, पंचवटी, पाषाण, पुणे ४११००८

फोन नं. ०२०-२९५१८२२२ / २९५१८३३३ ई-मेल: dp.mimhpune@gov.in

## :: जाहिरात ::

**विषय- सेंटर ऑफ एक्सलन्स योजनेंतर्गत संस्थेत मनोविकृती सामाजिक कार्य विभाग " सहायक प्राध्यापक" ०१ पद कंत्राटी पध्दतीने भरणेबाबत...**

केंद्र शासनाच्या सेंटर ऑफ एक्सलन्स योजनेअंतर्गत महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था, पुणे या संस्थेमध्ये विविध अभ्यासक्रमांसाठी खालील एकूण १ पद ३६४ दिवसांकरीता एकत्रित वेतनावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने भरण्याकरीता संस्थेमार्फत अर्ज मागविण्यात येत आहेत.

इच्छुक पात्र उमेदवारांकडून मागविण्यात येत असलेले अर्ज संस्थेचे अधिकृत संकेतस्थळ www.mimhpune.org वर जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते १०/०९/२०२४ रोजी सायं. १२.०० वाजेपर्यंत अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारले जातील. उमेदवाराने शैक्षणिक अर्हता, अनुभव प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत ऑनलाईन अपलोड करणे अनिवार्य राहील. अर्ज करण्यासाठीची लिंक www.mimhpune.org उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. या जाहिरीतीसंबंधीची सर्व माहिती संस्थेच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल.

### १) पदांचा तपशिल व दरमाह एकत्रित वेतन

| अ. क्र. | विभाग | पदनाम | एकुण पदसंख्या | एका पदासाठी दरमाह एकत्रित मानधन (रुपये) |
|---|---|---|---|---|
| १ | मनोविकृती सामाजिक कार्य | सहायक प्राध्यापक | १ | ९०,०००/- |

### २) पात्रतेचे निकष

२.१ उमेदवार हा भारताचा नागरीक असावा.

२.२ शैक्षणिक अर्हता, अनुभव व वयोमर्यादायाचा पदनिहाय तपशिल खालीलप्रमाणे

| अ. क्र. | पदाचे नाव | आवश्यक अर्हता व अनुभव | वयोमर्यादा |
|---|---|---|---|
| १ | **सहायक प्राध्यापक** | 1.Master degree in Social work from a recognized University or institution.<br>2. M.Phil in Psychiatric Social Work from a recognized University or institution.<br>3.Three years teaching and research experience as a Psychiatric Social Worker in a Mental Hospital, child Guidance Clinic or Psychiatric Department of a General Hospital.<br>Desirable:<br>Doctorate Degree in Social Work or Sociology or Applied Sociology from a recognized University or institutilon. | आवश्यक अर्हता व अनुभव धारण करणारे कोणत्याही वयोगटाचे उमेदवार सदर पदावरील नियुक्तीसाठी पात्र असतील तथापि वयाची ७० वर्षे पूर्ण झालेनंतर अशा उमेदवारांना नियुक्ती अथवा यथास्थिती पुर्ननियुक्ती देता येणार नाही. |

**२.३ शैक्षणिक अर्हता व अनुभवाचा कालावधी गणना करण्याचा दिनांक:**

२.३.१ प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करण्याकरीता विहित केलेल्या अंतिम दिनांकास संबंधित शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक राहील.

२.३.२ अनुभवाच्या कालावधीची गणना प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करण्याकरीता विहित केलेल्या अंतिम दिनांकास अनुसरुन करण्यात येईल.

## ३. इतर अटी:

३.१ निवड झालेल्या उमेदवाराचा नियुक्ती कालावधी हा ३६४ दिवस इतका असेल.

३.२ उमेदवाराचे कामकाज समाधानकारक नसल्यास, गंभीर स्वरुपाची अनियमितता, गैरवर्तवणूक या कारणासाठी त्यांची नियुक्ती कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय संपुष्टात येईल.

३.३ करार पध्दतीने नियुक्त उमेदवाराने प्रस्थापित मानकांनुसार अध्यापन, रुग्णसेवा व संचालक-प्राध्यापक यांनी नेमून दिलेली विवक्षित कामे पार पाडणे आवश्यक राहील.

३.४ वरील प्रमाणे विहित कामकाज पार पाडल्यानंतर महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्ये व जबाबदाऱ्यांवरविपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता घेवून उमेदवारास यथास्थिती सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीने खाजगी व्यवसाय करण्याची मुभा राहील.

३.५ करार पध्दतीने नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही. सदर पदांचीनेमणूक ही पूर्णत: कंत्राटी पध्दतीची असेल. या अधिकारी / कर्मचाऱ्यांना शासकिय कर्मचारी गणले जाणार नाही. संचालक-प्राध्यापक, महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था पुणे हे उपरोक्त सर्व पदांसाठीनियुक्ती प्राधिकारी असतील.

३.६ करार पध्दतीने नियुक्त उमेदवारास त्याच्या सेवा कालावधीत केवळ नैमितिक रजा अनुज्ञेय असतील.

३.७ करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणारी कागदपत्रे/माहिती व इतर सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

३.८ करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करण्यात येणार नाहीत.

३.९ संचालक-प्राध्यापक यांचेकडून उमेदवारांच्या कामकाजाचे मुल्यांकन करण्यात येईल.

३.१० उमेदवारास नियुक्ती देण्यात आल्यानंतर किमान एक शैक्षणिक सत्र संपेपर्यंत त्यास कोणत्याही परिस्थितीत सेवा सोडता येणार नाही. तशा आशयाचे शपथपत्र उमेदवारास नियुक्तीपूर्वी सादर करणे बंधनकारक असेल. असे शपथपत्र सादर करणा-या उमेदवारासच करार पध्दतीने नियुक्ती देण्यात येईल. त्यामुळे शैक्षणिक सत्र चालू असलेल्या कालावधीत विद्यार्थी हित विचारात घेता उमेदवाराचा राजीनामा कोणत्याही परिस्थितीत स्वीकारला जाणार नाही.

३.११ संचालक-प्राध्यापक हे शासनाच्या वतीने नियुक्तीच्या वेळी संबंधितांबरोबर विहित प्रपत्रात करार करतील.

३.१२उमेदवाराने त्याच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या कोणत्याही प्रकारे दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

३.१३ उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

३.१४ मुलाखतीला येताना उमेदवारांनी Online सादर केलेल्या सर्व दस्तऐवजांची मुळ कागदपत्रे सोबत आणणे बंधनकारक राहील.

## ४. निवड प्रक्रिया

४.१ सर्व प्राप्त अर्जांची पात्रतेच्या निकषांनुसार पडताळणी समितीमार्फत पडताळणी करण्यात येईल. अर्जांच्या पडताळणी प्रक्रियेमधून पात्र /अपात्र झालेल्या उमेदवारांची यादी संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर (www.mimhpune.org) प्रसिध्द करण्यात येईल. पात्र उमेदवारांनी मुलाखतीकरीता हजर रहावे.

मुलाखतीची वेळ, दिनांक आणि ठिकाण संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. मुलाखतीबाबत कोणत्याही उमेदवारांना व्यक्तीश: कळविण्यात येणार नाही.

४.२ मुलाखतीच्या दिवशी पात्र उमेदवारांनी त्यांची सर्व मूळ प्रमाणपत्रे घेऊन येणे आवश्यक आहे. मुलाखतीस पात्र होणाऱ्या उमेदवारांची संस्थेअंतर्गत गठीत मंडळामार्फत मुलाखत घेण्यात येईल. उमेदवार मुलाखतीसाठी गैरहजर राहिल्यास तो निवडीस पात्र राहणार नाही.

४.३ उमेदवारांचे खालीलप्रमाणे मुल्यांकन करण्यात येईल.

**Psychiatric Social Worker**

| Sr. No | Topic | Max. Marks |
|---|---|---|
| 1 | Additional qualification in Psychiatric Social Work (Ph.D. /Fellowship / Certificate course etc.) | **10** |
| 2 | Experience<br>2 marks for each year after M.Phil. in Psychiatric Social Work | **30** |
| 3 | Research Paper Publications<br>I. 2 marks for each publication in indexed journals in the subject of Psychiatric Social Work<br>II. 1 Mark for each poster / paper presentation at National or International Conference/ Book chapters publication (ISSN/IBSN)/ Guest Speaker at CRE Programme/ National or International Conference/ seminar | **10** |
| 4 | Interview - | **50** |
| | Total | **100** |

४.४ वरील मुल्यांकन तक्त्यातील अनुक्रमांक १ ते ४ च्या आधारे उमेदवारांची मुलाखतींकरीता गुणवत्ता यादी संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच अनुक्रमांक ५ च्या आधारे उमेदवारांचे मुलाखतीदरम्यान मुल्याकंन करण्यात येईल.

४.५ मुल्यांकनाच्या आधारे उमेदवारांची **निवड यादी व प्रतिक्षा यादी** संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

## ५. वेळापत्रक

| अ.क्र. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| **१.** | संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द केल्याचा दिनांक | २१/०८/२०२४ |
| **२.** | ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याचा अंतिम दिनांक | १०/०९/२०२४ |
| **३.** | पात्रतेच्या निकषानुसार मुलाखतीसाठी पात्र / अपात्र उमेदवारांची तात्पुरती यादी संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याचा दिनांक | १३/०९/२०२४ |
| **४.** | आक्षेपांकरीता मुदत | २०/०९/२०२४ |
| **५.** | मुलाखतीसाठी पात्र / अपात्र उमेदवारांची अंतिम यादी | २४/०९/२०२४ |

५.१ मुलाखतीचा दिनांक कळविण्यात येईल.

## ६. अर्ज करण्याची पध्दत

६.१ **अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्विकारण्यात येतील.**

६.२ ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सुचना संस्थेचे संकेतस्थळ www.mimhpune.org यावर उपलब्ध आहेत. ऑनलाईन अर्ज करण्याकरीताची लिंक **http://www.mimhpune.org/job_openings.php** ही आहे.

६.३ उमेदवार एका पेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करु शकतात. प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र परिपूर्ण अर्ज

(स्वतंत्र शुल्कासहीत) असणे आवश्यक आहे.

६.४ अर्ज सादर करण्याचे टप्पे

६.४.१ संस्थेच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीवर विहित पध्दतीने नोंदणी करावी.

६.४.२ विहित कालावधीत तसेच विहित पध्दतीने आवश्यक कागदपत्रे अपलोड करुन अर्ज सादर करणे.

६.४.३ अर्ज शुल्काचा भरणा विहित पध्दतीने करणे.

६.४.४ संस्थेस अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत अर्ज शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

६.४.५ ऑनलाईनपध्दतीने अर्ज भरताना काही तांत्रिक अडचण उद्भवल्यास उमेदवाराने help.mimh@gmail.com वर संपर्क साधावा.

६.५ शुल्क रुपये

६.५.१ अराखीव (खुला) -७५०/- रुपये

६.५.२ मागासवर्गीय, आर्थिकदृष्टया दुबल घटक व अनाथ - ४५०/- रुपये

६.५.३ उपरोक्त शुल्काव्यतिरिक्त बँक चार्जेस तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील.

६.५.४ सदरील शुल्क हे ना परतावा (Non-refundable) आहे.

६.६ सदरील शुल्क संस्थेच्या **Bank of Baroda, BJMC, Station Road Branch, Pune**च्या खाते क्रमांक -**98260100005746**, **IFSC code -** BARB0DRCBJM (fifth character is zero)या खात्यात ऑनलाईन पध्दतीने भरणा करुन त्याची पोच पावती अर्जासोबत अपलोड करावी.

६.७ अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकानंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांचा भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही.

६.८ सदर भरती प्रक्रियेकरीता उमेदवाराने संस्थेचे अधिकृत संकेतस्थळ www.mimhpune.org वर प्रसिध्द करण्यात येणाऱ्या अद्ययावत माहितीचे नियमितपणे अवलोकन करावे. जाहिरातीमध्ये बदल झाल्यास / भरती प्रक्रिया रद्द झाल्यास / मुलाखतीकरीता पात्र, अपात्रतेबाबत उमेदवारांना संस्थेमार्फत व्यक्तींश: कळविण्यात येणार नाही.

**७. सदरील भरतीप्रक्रियेमध्ये कोणत्याही वेळी कोणतेही बदल करण्याचे अथवा भरती प्रक्रिया रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार संचालक-प्राध्यापक यांनी राखून ठेवले आहेत.**

सदरील जाहिरात ही संस्थेच्या www.mimhpune.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**दिनांक** : २१/०८/२०२४

**ठिकण** : पुणे

Sd/-

**संचालक-प्राध्यापक**

**महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था, पुणे**